ISSN 2229-6190
RNI. MAHMUL02937/2010/35848

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

CHIEF EDITOR
DR. BALAJI KAMBLE

RNI. MAHMUL02937/2010/35848

IMPACT FACTOR - 2.03

ISSN 2229-6190

SOCIAL GROWTH

Vol. III, Issue : IX, Nov. 2014 To April 2015

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Library Consortia in India | Sadashiv B. Warvate | 1-8 |
| 2 | Dr. B.R. Ambedkar and Women Empowerment in India | Mahesh Ganwar | 9-16 |
| 3 | खिलाडियों के प्रशिक्षण मे आर्थिक एवं प्रशासनिक समस्यों का अध्ययन | वाय. पी. निकम | 17-21 |
| 4 | प्रशिक्षित शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास | डॉ. व्ही. जी. घोनशेटवाड | 22-25 |
| 5 | लातूर जिल्हयातील घटते लिंग गुणोत्तर एक समस्या | डॉ. जे. के. वाघमारे | 26-32 |
| 6 | भारताला जागतिक शक्ती बनण्यासाठी गांधीवादाची गरज | डॉ. हरीनारायण जमाले | 33-36 |
| 7 | आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग आणि पालकांच्या अभिवृत्तीचा अभ्यास | यु. पी. आंधळे | 37-40 |
| 8 | विधानसभा निवडणूका २०१४ : सोलापूर जिल्हयातील राजकारणाचा आढावा | शाम लेंडवे | 41-48 |
| 9 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील फकिरा या पात्राचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास | बालाजी पिडगे | 49-56 |
| 10 | लिंगभाव विषमता आणि स्त्रियांचे आरोग्य | डॉ. सिंधू काकडे | 57-67 |
| 11 | स्त्रीयांच्या सक्षमीकरणाबाबतच्या कायद्यांचा चिकित्सक अभ्यास | अशोक मोठे | 68-73 |
| 12 | स्त्री भ्रुण हत्येच्या कारणांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. संध्या बीडकर | 74-77 |

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 2.03
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Vol. III, Issue : IX, Nov. 2014 To April 2015 

12

# स्त्री भ्रुण हत्येच्या क़ारणांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. संध्या बीडकर**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
मिलिया महाविद्यालय,
बीड, जि. बीड

*Research Paper - Sociology*

स्वामी तिनही जगाचा आई विना भिकारी असे मानुन आपण आपल्या जन्मदात्रीच्या चरणी नतमस्तक होतो. तिच्यामुळे आपणाला हे विश्व पाहता आल याची पुर्ण जाणीव असते म्हणुनच जन्मासाठी माता, राखीच्या प्रेमाचा धागा बांधण्यासाठी बहिण व पत्नीच्या रुपात चांगली जीवनसांगिनी हवी असते परंतु सर्वश्रेष्टवान, कन्यादानासाठी मुलगी असावी लागत असली तरी जेंव्हा मुलीचा जन्म होण्याची चाहुल लागते तेंव्हा जन्माला येण्यापुर्वीच तिला जन्माला येण्याचा हक्कच हिरावुन घेतला जातो.

**स्त्रियांचे समाज व्यवस्थेतील स्थान**

बेबोलीन व इजिप्त संस्कृती मध्ये स्त्रीयांचा जो मानसन्मान होता तसा इतर कोणत्यापण संस्कृती मध्ये तो नव्हता हे नाकारता येणार नाही. यंत्र नार्यस्तु पुज्यते रमन्ते तत्र देवता म्हणजे जिथे स्त्रियांचा मानसन्मान केला जातो तिथे देवतांचे वास्तव्य असते अशा प्रकारची मुल्ये व्यवस्था असलेल्या भारतीय संस्कृतीने भौतिक विकासाच्या या व्यवस्थेत अभौतिक तत्वाना मात्र मुठ मातीत ठेवले त्यामुळे महिलांचे स्थान दुय्यम ठरत गेले आणि आज आणि उदया स्त्रियांचे क्षेत्र चुल आणि मुल एवढया मर्यादीत क्षेत्रात आडकुन पडले त्यामुळे त्यांच्या वाटयाला रांधा, वाढा आणि काढा हे कार्य चालुच राहीले. स्त्री म्हणजे वस्तु (गुलाम) केवळ उपभोग घेण्यासाठी तिला समाजात स्थान निर्माण झाले. समाज व्यवस्थेतील संपुर्ण घटकांकडुन अपमानास्पद वागणुक दिली गेली. स्त्रियांचा भारतात आदर झ ाला तससाच उलट तिचा उपमर्द करणे तिच्यावर दहशत निर्माण करणे तिच्यावर बळजबरीने उपभोग घेणे या साध्या गोष्टी पुरुषाना पुरुषार्थाच्या गौरवाच्या वाटत राहील्या.

भारतीय राज्यघटनेने महिलांना स्वतंत्र व्यक्ती म्हणुन जगण्याचा आपला विकास करुन घेण्याचा अधिकार

जिल्हाधिकारी नगर परीषदेचे मुख्य अधिकारी व गट विकास अधिकारी इ.

बालविवाहाचे आरोग्यावर होणारे दुष्परीणाम खालीलप्रमाणे :

1) स्त्री कंटीबंधाच्या हाडाची वाढ पुर्ण न झाल्यामुळे प्रसुतीच्या वेळी हाडाना व आतील अवयवाना इजा होऊ न कायमचे अपंगत्व येऊ शकते.

2) गर्भाशय व योनीमार्गाची वाढ पुर्ण न झाल्यामुळे गर्भपात कमी वजनाचे बाळ, अकाली प्रसुती उपजत मृत्युची शक्यता प्रसुती वेदना सहन करण्याची क्षमता कमी असल्यामुळे माता मृत्युची संभावना अधिक असते.

3) मातेच्या शरीरातील पोषक दृव्ये कमी झाल्यामुळे कुपोषणाची शक्यता व त्यामुळे शारीरीक दुर्बलता व जन्मतः कमी वजनाच्या मुलाचे प्रमाण अधिक व अर्भक मृत्युदरात वृध्दी.

4) मानसिक अपरीपक्वतेमुळे बाल संगोपन अडथळे निर्माण होतात.

5) मुलीचे शिक्षण अपुर्ण राहुन बौध्दीक विकास खुंटतो व ती स्वावलंबी होऊ शकत नाही.

6) लवकर विवाहामुळे लोकसंख्यावृध्दी झपाटयाने होते.

विधवा पुनर्विवाह कायदा (1856)

विधवा हिंदु स्त्रियांचे समाजात होणारी कुचंबना थांबवण्यासाठी पुनर्विवाहास वैधता आणि अपत्याना कायदेशीर हक्क प्रदान करण्याचे उद्दिष्टाने हा कायदा करण्यात आलेला आहे. कायदा सर्व पंथी हिंदु व्यक्तीना लागु असुन त्यातील प्रावधाने खालील प्रमाणे :

1) विधवा पुनर्विवाह कोणत्याही पध्दतीने झाला असल्यास तो वैध असुन त्यातुन होणारी अपत्ये कायदेशीर असतील.

2) प्रथम पतीची पुनर्विवाह संमती नव्हती असे स्पष्ट असल्यास विधवेचे प्रथम पतीकडील निर्वाह वारसा इत्यादीचे पुर्वी मिळालेले किंवा नंतर मिळणारे अधिकार पुनर्विवाहापासुन संपुष्टात येतील.

3) प्रथम विवाहातुन जन्मलेल्या पुत्राचा मृत्यु झाल्यास त्याच्या मिळकतीचा वारसा तिला पुनर्विवाहानंतरही देय होईल.

4) मृत पतीच्या मुलाचे पालकत्व तिच्या पुनर्विवाहानंतर मुलांचे आजोबा / आजी किंवा पतीच्या इतर नातेवाइ्रकाकडे देण्यात येईल.

5) अज्ञान किंवा सहवास न झालेल्या बाल विधवेच्या पुनर्विवाहासाठी पिता नसल्यास आजोबा आजी भाऊ किंवा इतर जवळच्या नातेवाईकाची हयाच क्रमात संमती आवश्यक राहील.

दिलेला असला तरी प्रत्यक्षात मात्र महिलांची स्थिती दुय्यम आहे. दिवसेंदिवस तिच्यावरील हिंसाचारात वाढ होत असुन यास हिंसाचाराला भ्रुणावस्थेपासुनच सुरुवात होते वास्तवत: स्त्री पुरुष हे समाजाची दोन चाके आहेत तसेच सदृढ व निरोगी समाजाच्या जडण घडणीसाठी स्त्री पुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरीत्या राखणे आवश्यक असले तरी स्त्री पुरुष प्रमाणचा वाढता असमतोल ही ज्वलवंत समस्या आहे.

**उद्देश**

**गृहितकृत्ये**

1) स्त्री भ्रुणहत्येमुळे स्त्री पुरुष प्रमाणात विषमता निर्माणा झाली आहे.
2) स्त्री भ्रुणहत्येमुळे मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण घटले आहे.
3) स्त्री भ्रुणहत्येस माता पिता, नातेवाईक, सोनोग्राफी तज्ञ व प्रसुती तज्ञ जबाबदार आहेत.
4) गर्भलिंग चाचणीमुळे स्त्री भ्रुणहत्येचे प्रमाणे वाढले आहे.
5) स्त्री भ्रुणहत्या करण्यामध्ये समाजाच्या सर्वच स्तरातील लोकांचा समावेश आहे.
6) समाजाच्या मानसिकतेमध्ये या समस्येचे मुळ आहे.

**तथ्य संकलन व विश्लेषण**

शोधनिबंध दुय्यम स्त्रोताच्या आधारे तयार केला असुन त्यासाठी संबधीत विषयाचे ग्रंथ, शोध प्रबंध, मासिके, वर्तमानपत्र इत्यादी साहित्याचा आधार घेतला आहे.

**स्त्री भ्रुणहत्येची कारणे**

**वंशाचा दिवा**

वास्तवतः खरच वंशाला दिव्याची गरज असते का ? जर असेलच तर आजपर्यंत अशा किती दिवट्यांनी कुंटुब आणि समाजासाठी दिवे लावले आहेत तरी वंशाचा दिवा लागतोच आणि तो जो मुलगाच पाहिजे अशा प्रकारच्या समाज मनावर प्रभाव पडल्यामुळे कांहीजण मुलगा होईपर्यंत पाळणा चालवत ठेवतात.

**(ड्युलाईझम) दुटप्पी मानसिकता**

स्त्री भ्रुणहत्या समसेच्या कारणांचा विचार करताना समाजाच्या मानसिकतेमध्ये या समसेचे मुळ असल्याचे दिसुन येते. विशेषत: समाजामध्ये उघड चर्चा करताना प्रत्येकजण मुलगा काय, अन मुलगी काय दोन्ही सारखीच असे म्हणतात आणि मनात मात्र मुलांची इच्छा असते यामुळे नाही किंवा होय असे प्रकार घडत असले तरी स्त्री भ्रुणहत्या मात्र करत आहे.

**कृषिपधानता (पुरुष प्रधान)**

भारतामध्ये शेती मोठया प्रमाणात केली जात असल्यामुळे पुरुष हा शेतीचा राखणदार असतो किंवा कर्ता असतो. त्यामुळे पुरुष हा समाजातील महत्वाचा घटक मानला गेल्याने स्त्रियांना कमी महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे

RNI MAHMUL 02937/2010/35646 IMPACT FACTOR-2.03
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Vol. III, Issue : IX, Nov. 2014 To April 2015 

पुरुषाचे हक्क, कर्तव्य, अधिकार, दर्जा मिळत गेल्या आणि स्त्रिला मात्र गौणत्व प्राप्त झाल्यामुळे स्त्री भ्रुणहत्या अनेक कारणापैकी महत्वाचे कारण मानले जात आहे.

**स्त्रीयांच्या वैवाहिक सुरक्षीत आयुष्यासाठी मुलगा हवा**

आपण समाजाचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, महिलांच मुलासाठी खुप आग्रही असतात. कारण आपल्या वैवाहीक जिवनामध्ये पुत्र झाल्यामुळे समाजामध्ये सुरक्षितता मिळते. आपला पती दुसरे लग्न करणार नाही या कारणास्तव स्त्रीयांचा मुलासाठी आग्रह धरत असतात.

**आर्थिकता (गरीबी)**

हुंडा देण्यासाठी आपल्याकडे व्यवस्था होऊ शकत नाही किंवा अतिरीक्त हुंडा दयावा लागतो त्याच बरोबर मुलींना समाजात ताट मानने जगता येत नाही. त्यांना शिक्षण देऊ शकत नाही या कारणामुळे पण स्त्री भ्रुणहत्या होताना दिसतात.

**मानसिकता**

आपला शेजाऱ्याला मुलगा झाला, आपणालाँ पण मुलगा झाला पाहिजे आणि आपल्या शेजाऱ्याचे किंवा नातेवाईक यांचे गर्भलिंग चाचणी करुन गर्भातील काय आहे हे लक्षात आले व त्यांनी गर्भ खाली केला आपण पण तसे करु शकतो या मानसिकतेमुळेपण गर्भभ्रुण हत्या वाढत असल्याचे समोर येत आहे.

**स्त्री भ्रुणहत्येचे परिणाम**

1) मुलाची वाढ पहात होणाऱ्या अपत्यामुळे लोकसंख्येचा (भस्मासुर) भार वाढत आहे.
2) नकोशी होतेय वंशाची ज्योत
3) मुलींच्या आपल्या संख्येमुळे पत्नीचीही वाटणी भविष्यात बहुपत्नीत्वाची भिती
4) मुलींच्या घटत्या संख्येमुळे महिलावरील अत्याचार व अपहरणाची समस्या

**स्त्री भ्रुण हत्येवरील उपाय**

1) कायदयाची प्रभावीपणे अमंलबजावणी करणे आवश्यक
2) प्रत्येक जिल्हयातील सर्व सोनोग्राफी सेंटर एका वेबसाईटला जोडीवत व डॉक्टरांनी रुग्णांची माहिती उपलोड करणे बंधनकारक करावे सदरील नोंदी तपासावी समितीसाठी व जिल्हाधिकारी कार्यालयात तपासणीसाठी धीही उपलब्ध करणे.
3) लिंगभेद कमी झाल्यासच स्त्री भ्रुण हत्येचे प्रमाणे कमी होईल.
4) महिलांना आर्थिक, राजकीय व सामाजिकदृष्टया सक्षम बनविणे.

**सारांश**

स्त्री भ्रुण हत्या ही संघटीत गुन्हेगारी असुन यामध्ये रुग्ण, त्यांचे नातेवाईक, डॉक्टर, सोनोग्राफी तंत्रज्ञ,